| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२१३१/२०१५ |
| सरकार -वि- दिपा वगैरे |
| निशाणी क्र.३५ |

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची शपथेवर सरतपासणी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | उमाकांत सोमला राठोड |
| **वय** | : | ४४ वर्ष |
| **धंदा** | : | पि.एस.आय. |
| **राहणार** | : | वर्धा |

**<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत</u>**

दिनांक २१.०५.२०१५ रोजी माझी पि.एस.आय. म्हणून लकडगंज पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलींग डयुटी होती. त्यावेळी लकडगंड एरीयातील रेडलाईट भागात सायंकाळी ७.०० ते ७.३० वाजताच्या दरम्यान दिपा नावाची महिला अश्लील इशारे करीत होती. सदर ठिकाण हे सार्वजनीक ठिकाण होते. महिला कर्मचाऱ्याने तिला ताब्यात घेतले. तिने असे सांगितले की, ती वेश्या व्यवसाय करते व मुन्नीबाईच्या घरी ग्राहकांना वेश्या व्यवसायासाठी घेवून जाते. तिची अंगझडती महिला कर्मचारी यांनी घेतली परंतु काही मिळून आले नाही. त्यानंतर मी पोलीस स्टेशनमध्ये येवून रिपोर्ट दिला.

२. त्यानंतर मुन्नीबाई यांच्या घरातील घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष केला. त्याठिकाणी पलंग व गादी मिळून आली. त्याठिकाणावरुन बजरंगबली मंदीर १०० मिटर अंतरावर होते. तसेच बालाजी मंदीर १५० मिटर अंतरावर होते. त्यानंतर मी पंचासमक्ष पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखवला. त्यावर माझी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **<u>निशाणी ३६</u>** वर आहे.

३. त्यानंतर मी रिपोर्ट दाखल केला. सदर रिपोर्ट आता मला दाखवला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी ३७** वर आहे. छापील खबर निशाणी १८ वर आहे. त्यावर देखील माझी सही आहे. आरोपी क्र. १ आज न्यायालयात हजर आहे, मी त्यांना ओळखतो.

**सरतपास पुर्ण**

**उलट तपास आरोपींतर्फे अधिवक्ता श्री. ए. थॉमस यांचेमार्फत**

४. प्रस्तुत प्रकरण हे विशेष प्रकारचे असते. अशा प्रकारच्या प्रकरणांना विशिष्ट तपासीक अधिकारी नेमलेले असतात.

५. आरोपी कशाप्रकारचे इशारे करीत होती हे रिपोर्टमध्ये नमुद नाही. घटनास्थळी नेहमी रहदारी असते. त्या परिसरात पोलीस चौकीसुध्दा आहे. पंचांना नोटीस दिली होती. सदर नोटीसची प्रत दोषारोप पत्रासोबत दाखल नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने ती वेश्या व्यवसाय करते व मुन्नीबाईच्या घरी ग्राहकांना वेश्या व्यवसायासाठी घेवून जाते असे कोणतेही कथन केले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी पोलीस स्टेशनमध्ये बनविला. हे म्हणणे खरे नाही की, पंच हे नेहमीचे वापरलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली.

उलट तपास पुर्ण

**फेरतपास – नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

PANKAJ KAMLAKARRAO DESHPANDE
Digitally signed by PANKAJ KAMLAKARRAO DESHPANDE
Date: 2025.03.25 16:32:22 +0530

**(पंकज क. देशपांडे)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक २५.०३.२०२५